IJCRT.ORG ISSN : 2320-2882
INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या कृषी व उद्योग(व्यवसाय) धोरणाचे अध्ययन :-

**1Dr. Vasant Nanarao Patange**

**1Assistant Professor**

**1A.R.B.Art's, Commerce & Science, College, Shendurni, Dist. Jalgaon**

**प्रस्तावना :-**

छत्रपती शिवाजी हे महाराष्ट्राचेच नव्हे तर ते भारताचे मानबिंदू आहेत. ते केवळ वीर शिरोमनीच नव्हते तर कुशल संघटक व कुशल नियोजनकार होते.शिवकाळापुर्वी संपूर्ण भारतभर परकीयांचे वर्चस्व होते व स्थानिक राजे,सरदार हे त्यांच्याच वर्चस्वाखाली आपापसात लढत असत.महाराष्ट्रातील जनता धर्म-समाज यामध्ये विखुरलेली होती त्याचा फायदा घेवून परकीयांनी आपली सत्ता निर्माण केली.अशा काळात शिवाजी महाराजांनी स्वबळावर स्वराज्याची स्थापना करून महाराष्ट्राचे नाव जागतिक इतिहासात अजरामर केले.महाराजांचे कार्य सर्वच क्षेत्रात उत्तम असे होते प्रस्तुत विवेचनात शिवकालीन कृषी धोरणाचे अध्ययन करण्यात आले आहे. शिवकाळात महाराष्ट्रातील आर्थिक व समाज जीवन हे शेती व्यवसायावर मोठ्या प्रमाणात अवलंबून होते. 'उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ नोकरी' या उक्तीप्रमाणे शेतीला अनन्य साधारण असे महत्वाचे स्थान होते. शेतीवरच सर्व गावगाडा अवलंबून असे.१७ व्या शतकात महाराष्ट्रातील स्थित्यंतराचा परिणाम शेती व शेतकऱ्यांच्या जीवनावर पडत होता.पावसाची अनिश्चितता, सिंचन सुविधांची कमतरता, नेहमीच युद्धाचा प्रसंग, दुष्काळ ई. कारणांमुळे महाराष्ट्रातील शेती मागासलेली होती मात्र शिवकाळात शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या नाहीत, कारण शिवरायांचे शेती व शेतीविषयक धोरणच असे होते की, शेतकऱ्यांची कधीही हेळसांड होऊ दिली नाही.शत्रूंच्या आक्रमणापासून शेती व शेतकरी वाचला पाहिजे याची काळजी महाराज घेत असत व तशी काळजी घेण्याचे सक्त आदेश आपल्या सैन्याला देत असत.

**संशोधनाची उद्दिष्ट :**

1.शिवाजी महाराजांच्या आर्थिक धोरणाचे अध्ययन करणे.

2. शिवाजी महाराजांच्या कृषी धोरणाचे अध्ययन करणे.

3. शिवाजी महाराजांच्या व्यापार विषयक धोरणाचे अध्ययन करणे.

**शेतकऱ्यांना अर्थसहाय्य:-**

दुष्काळाच्या काळात शेतकरी जगाला पाहिजे यासाठी शिवराय ठामपणे त्यांच्या पाठीशी उभे राहिले.अनेकवेळा शत्रूंकडून जनावरे पळवून नेली जायची यामुळे शेतीसाठी आवश्यक असणारी बैलजोडी पळवून नेल्यामुळे शेती व्यवसाय करता येत नसे.अशा वेळेस गरजू शेतकऱ्यांना बैलजोडी व शेतीसारही आवश्यक ते अर्थसहाय्य देण्याचे व ते बिनव्याजी देवून शेतकऱ्यांच्या कुवतीप्रमाणे व सवडी प्रमाणे हप्त्याने वसूल करण्याचे आदेश शिवरायांनी आपल्या अधिकाऱ्यांना दिले होते.

"ज्याला शेत करावयास कुवत आहे आणि त्याला जोतास बैल, नांगर, पोटास दाणा नाही, त्यावीण तो आडोन निकामी झाला असेल, तरी त्याला रोख पैके हाती देवून दो चौ बैलांचे पैके, बैल देवावे, बैलांचे व गल्याचे पैके वाढी दिधी न करता मुदलच उसने हळूहळू याचे तावंगी माफिक घेत घेत उसूल द्यावा, जोवरी त्याला तावंगी येई तोवरी वागवावे." शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या उपकरणांची खरेदी करण्यासाठीही कर्ज देण्याची व्यवस्था शिवरायांनी केली होती.शेतीतून अधिक उत्पादन घेण्यासाठी चांगल्या उत्कृष्ट दर्जेदार बियाण्यांची आवश्यकता असते ते घेण्यासाठी गरजू शेतकऱ्यांना आर्थिक मदत केली जात होती. 'शेतकरी सुखी तर राजा सुखी, शेतकरी गरीब तर राजा गरीब आणि राज्य गरीब' म्हणून शेती व्यवसायाची भरभराट व्हावी यासाठी शिवरायांनी शेतीला अर्थसहाय्य देण्याचे धोरण राबविले होते.म्हणून ते अधिकार्याला आदेश देतात "या कलमास (शेतकऱ्याला) जरी दोन लाख लारी पावेतो खर्च करिशील आणि कुणब्याची खबर घेऊन त्याला तवानगी ये ती करून कीर्द करिसील, आणि पद जमीन लावून दस्त जाजती करून देसील तरी साहेबा कबुल असतील" सैन्याकडून शेती व शेतकऱ्यांचे युद्धाच्या काळात नुकसान केले जात असे. उभी पिक कापली जायची व शेतकरी देशोधडीला लागायचे, महाराजांनी मात्र शेतीचे व शेतकऱ्यांचे नुकसान न करण्याची सक्त ताकीद आपल्या सैन्य व अधिकाऱ्यांना दिली होती.शेतीच्या विकासासाठी शेतसाऱ्यात सूट देणे, सरामुक्त जमीन देणे, त्यांना संरक्षण देणे ई.उपाययोजना महाराजांच्या काळात केल्या जात असत. शेतकऱ्यांचे संरक्षण हे शिवकाळात आद्य कर्तव्य मानले

जाई व त्यात कुचराई झाल्यास परगण्याच्या वतनदाराना जबाबदार धरले जात होते. वतनदाराना वतन हे शेतीच्या विकासाला अनुकूल परिस्थिती निर्माण करावी यासाठीच दिले जात असे तसे महाराजांचे आदेश होते.

शेतकऱ्यांच्या स्थलांतरास महाराजांच्या काळात फार महत्व दिले जात असे.त्यासाठी तेथील अधिकारी व वतनदाराना जबाबदार धरले जात होते. कारण शेतकरी हे वतनदारांच्या जाचामुळे स्थलांतर करायचे किंवा त्यांना स्वताच्या संरक्षणा बाबतची खात्री नसेल तर म्हणून हे स्थलांतर होऊ नये यासाठी शेतकऱ्यांची सर्वोतोपरी काळजी घेण्याची जबाबदारी तेथील वतनदारांवर होती. रयतेने गाव सोडून जाऊ नये याची विशेष खबरदारी घेतली जात असे. गावामध्ये जर नवीन शेतकरी आले तर त्यांची विशेष काळजी घेऊन त्यांना सर्वोतोपरी सहाय्य देण्याचे धोरण महाराजांच्या काळात अवलंबिले जात असे,याचा प्रत्यय शिवाजी महाराजांच्या अनेक पत्रावरून येतो.पेरणीच्या काळात शेतकऱ्यांकडे थकबाकी असली तरी ती वसूल केली जात नसे उलट त्याला आवश्यकता असल्यास नवीन आर्थिक मदत दिली जात असे.

**जलसिंचन सुविधा :-**

कृषी आधारित अर्थव्यवस्थेत कृषीच्या पायाभूत सोयी सुविधांना जास्त महत्व असते.त्यातही जलसिंचन सुविधांना अधिक महत्व असते. शिवकाळापूर्वीही राजे महाराजे शेतीला जलसिंचनासाठी विहिरी, कालवे, नदी याद्वारे पाणी पुरवठा केला जात असे, अनेक गावामध्ये सरकारच्या सहाय्याने गावकरी छोटे बांध घालून त्याचा उपयोग शेतीसाठी करित असत. बंधाऱ्यांची, कालव्यांची देखभाल करणे ही गाव कार्यांची जबाबदारी असायची, गावकऱ्यांनी अधिकाधिक बांध बांधावे यासाठी सरकार नेहमी प्रोत्साहन देत असे मात्र आर्थिक मदत खूप कमी केली जात असे.त्यामुळे जलसिंचन सुविधांची शेतीच्या तुलनेने कमतरता होती. शिवरायांच्या काळात बागायती शेतीपेक्षा जिरायती शेती जास्त होती.

**शेतमाल किमत धोरण :-**

स्वराज्यात शेतमालाला रास्त भाव मिळेल याची दक्षता शिवराय घेत असत. महाराजांचे अधिकाऱ्यांना 'येका भाजीच्या देठा' चीही अपेक्षा न करता टू नेकाने वागले पाहिजे असे सक्त आदेश होते.रयतेचा वाटा रयतेला पोहचता करून राजभागाची वसुली केली जात असे.अनेकवेळा धान्यरूपाने गोळा झालेला सारा अधिकारी ते धान्य सांभाळण्याचे जोखीम नको म्हणून बाजारभावाने विकत असत यामुळे सरकारचा तोटा होत असे.याकरिता अधिक किमत येई पर्यंत ते धान्य

साठवण्याचे आदेश अधिकाऱ्यांना होते. हंगामाच्या काळात शेतमालाचा पुरवठा अधिक असे त्यामुळे त्याच्या कींमती कमी होत असत अशा वेळी तो शेतमाल अतिरिक्त मोबदला देऊन खरेदी करावा व शेतकऱ्यांची हानी कमी करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना होत्या. अधिक किंमातीसाठी शेतमाल परराज्यात नेऊन विकला जात असे.शेतमालाला किंमत चांगली मिळण्यासाठी तो एका बाजारऐवजी विविध राज्यातील बाजारात विकावा व त्यात तोटा होता कामा नये अशी सूचना महाराजांची असायची. आरमार उभारणीसाठी किंवा इतर कारणांसाठी लाकडांची किंवा इतर कृषी साधनांची आवश्यकता असल्यास ते त्या शेतकऱ्यांच्या परवानगीने व योग्य मोबदला देऊन विकत घेण्याचे आदेश महाराजांचे होते.शेतकऱ्यांना योग्य मोबदला देऊनच शेतीची संपादणूक केली जात असे. शेतमाल बाजाराचा विस्तार व्हावा यासाठी विविध राज्यातून व्यापारी आपल्या राज्यात खरेदीला येतील अशी व्यवस्था महाराजांनी केली होती.

**महसूल पद्धती :-**

शिवाजी महाराजांच्या काळात जमीन महसूल प्रणालीचे वतनदारी (जहागीरदारी) नसून रयतवारी होती. देशमुख, देशपांडे, पाटील व चार गावकरी यांच्या समितीकडून खेड्याची महसूल निश्चिती केली जात असे.शिवाजी महाराजांनी आपल्या काळात जमिनीची मोजदाद योग्यपणे करून तशी कायमस्वरूपी नोंद ठेवण्याचे धोरण अवलंबिले होते व त्यावरून शेतसारा आकारला जात असे. अधिकाऱ्यांकडून जमिनीची पाहणी करून शेतसारा निश्चित केला जात असे. जमिनीची तिच्या सुपिकतेवरून विभागणी केली जात होती.सुपीक, मध्यम, कमी सुपीक जमीन व पडीक जमीन इ. शेतीत कोणती पिक घेतली जातात त्याचे उत्पादन किती यावरून शेतसारा निश्चित होत असे.शेतकऱ्यांची शेतसाऱ्यासंबधी काही तक्रार असल्यास त्याचा योग्य पद्धतीने निवाडा केला जात असे.शिवाजी राजांच्या काळात रोखीने व वस्तूच्या स्वरुपात अशा दोन्ही प्रकारे शेतसारा वसूल केला जात असे.दोन्हींचे मिळून हे शेतसाऱ्याचे प्रमाण २/५ इतके असावे असे इतिहासकारांचे अंदाज सांगतात.जिरायती जमिनीच्या तुलनेत बागायती शेतीवर अधिक शेतसारा आकारला जात असे.शिवरायांच्या काळात रयतेचा छळ करून शेतसारा वसूल केल्याचे इतिहासात आढळून येत नाही. रजनी परराज्यात आक्रमण करतानाही आक्रमण मार्गात येणाऱ्या शेतीचे नुकसान होणार नाही याची काळजी घेतली.यावरूनच शेती व शेतीविषयी असणारा दृष्टीकोन आपल्या लक्षात येतो.चौथाई, सरदेशमुखी, वतनदारी महाराजांच्या काळात होती मात्र वतनदारांच्या बंडखोर, जुलमी प्रवृतीना महाराजांनी आळा घातला. वतनदारानी सर्वसामान्यांप्रमाणे राहण्याचे फर्मान राजांनी दिले होते. वतनदारांची मिजासखोरी बंद केली होती.वतनदारानी रयतेशी स्नेहाने वागण्याचेही महाराजांनी

सुचविले होते.त्यामुळे अनेक वतनदार संधी मिळताच शिवरायांविरोधात कट कारस्थान करित असत वतनदारानी केवळ कारकून मंडळीच्याच आधाराने शेतसारा वसूल न करता स्वत रयतेमध्ये जावून तो वसूल करावा ज्यामुळे रयतेची विचारपूस होईल अशी महाराजांची अपेक्षा असे. कारण हा शेतकरी वर्ग महाराजांच्या लष्कराचा कणा होता.

शिवाजी महाराजांची जमीन महसूल पद्धती योग्य, न्याय, मानवी व शेतीला पोषक होती.ग्रँट डफनेही शिवाजी राजांच्या महसूल प्रणालीची श्रेष्ठता मान्य केलेली आहे. यावरूनच शिवकालीन महसूल पद्धती ही उत्कृष्ट होती असे म्हणता येईल.

**वर्तमान कृषी धोरण : -**

शिवाजी महाराजांच्या काळातील कृषी धोरण शेतकरीहित डोळ्यापुढे ठेवून राबविले जात असे. आजच्या काळात मात्र शेती आणि शेतकरी नेहमीच शासकीय धोरणांची उपेक्षा भोगत आहे.भारतात हरितक्रांती झाली कृषी उत्पादनात नवनवीन पद्धती, तंत्रज्ञान आले पण शेती इतर क्षेत्राप्रमाणे प्रगती करू शकली नाही हे वास्तव आहे. महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.पूर्वीच्या काळी परकीय आक्रमणामुळे शेतीचे सर्वात जास्त नुकसान होत असे आता मात्र तशी परिस्थिती नसूनही शेतीची तुलनेने प्रगती साधता आली नाही हे शेतकऱ्यांचे दुर्दैव म्हणावे लागेल. शिवाजी महाराजांच्या काळात शेतकऱ्यांना सहजतेने विविध कारणांसाठी आर्थिक मदत दिली जात होती व तीही मदत बिनव्याजी स्वरुपात होती.आज मात्र राष्ट्रीयकृत बँक, सहकारी बँकाचे विस्तारित जाळे असूनही त्या शेतकऱ्यांना कर्ज देण्यासाठी टाळाटाळ करित आहेत.शेतकरी सावकाराच्या कर्ज सापळ्यात अडकला आहे त्या सापळ्यात तो आयुष्यभर धडपडत आहे.शेतीला जलसिंचन, वीज ई. पायाभूत सुविधांची कमतरता आहे.शिवाजी महाराजांच्या काळात कृषीमालाला योग्य किंमत मिळावी या करिता अधिकाऱ्यांना सक्त ताकीद असायची तशी तक्रार असल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जात होती.आज मात्र शेतमालाला हमीभाव शासन जाहीर करूनही शासनाच्या खरेदी केंद्राची संख्या कमी असल्यामुळे शेतकऱ्यांना हमीभाव मिळत नाही. शेतमालाचे अनेक व्यापारी त्यांच्या मर्जीनुसार किंमतीत घट करतात व शेतमाल वजनातही शेतकऱ्यांची लुट केली जाते.शेतीसाठी असणाऱ्या अनेक योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाही.सुधारित बियाण्यांच्या नावाखाली शेतकऱ्याला सर्रास दुय्यम दर्जाच्या बियाण्यांची विक्री राजरोसपणे केली जाते.पूर्वीच्याकाळी शेती उत्तम समजली जात होती ती आता कनिष्ठ समजली जाते.वर्तमानात अनेक शेतकरी हे उत्पनाचे पर्यायी साधन नाही किंवा केवळ वडिलोपार्जित शेती आहे म्हणून ते शेती करित आहेत. आधुनिक काळात औद्योगीकरण आवश्यक

आहे पण शेतीला पूर्णता: दुर्लक्षून चालणार नाही.रजनी शेतकऱ्यांचे स्थलांतर होणार नाही याची विशेष खबरदारी घेतली. स्थलांतर झाल्यास तेथील वतनदार त्याला जबाबदार असे. त्यानंतर म.गांधीनीही खेड्याकडे चला अशी साद घातली कारण ग्रामीण भाग समृद्ध असेल तरच देश समृद्ध होईल.वर्तमान परिस्थितीत असे दिसून येते की,ग्रामीण भागातून स्थलांत रांचे प्रमाण वेगाने वाढत आहे यामुळे खेडी ओस पडत चालले आहेत.भविष्यात तर या ही पेक्षा विदारक चित्र खेड्यांचे पाहायला मिळेल.स्थलांतरामुळे शहरीभागांवर अतिरिक्त ताण निर्माण होत आहे.शिवकाळात अन्न, पाणी याचे अचूक व्यवस्थापन होईल याकडे महाराजांचे लक्ष असे हे त्यांच्या अनेक पत्रावरून स्पष्ट होते.आज मात्र पाण्याचे व्यवस्थापन सुयोग्य पद्धतीने न झाल्यामुळे तीव्र अशा युद्धसदृश्य पाणी समस्या निर्माण होत आहे.आजच्या या तंत्रज्ञान युगात भारतीय शेती दुर्लक्षित राहिली आहे असे खेदाने म्हणावे लागेल.पुन्हा कृषी क्षेत्रात शिवराज्य येण्यासाठी शेतीला वास्तवात प्राथमिकता देणे आवश्यक आहे.शेती आणि शेतकऱ्यांसाठी आज शिवाजी महाराजांच्या शेतीभिमुख धोरणाची आवश्यकता आहे.

**शिवकालीन उद्योग व व्यवसाय :-**

शिवाजी महाराजांच्या काळात खेडी व शेती हे त्यांच्या अर्थव्यवस्थेचा कणा होता. ग्रामीण भागात शेतीशी संबंधित अनेक छोटे व्यवसाय व उद्योग होते.हे सर्व व्यावसायिक स्थानिक गावकऱ्यांच्या गरजा पूर्ण करून उर्वरित माल आजूबाजूच्या बाजारपेठेत विकत असत. प्रत्यकजण आपला जो पारंपारिक व्यवसाय असे तोच व्यवसाय करित असत वेगळा व्यवसाय करण्याचा प्रयत्न फारसे कुणी करित नसे.ग्रामीण भागातील प्रत्येक व्यवसायाला समाजात निश्चित स्थान असायचे व त्यांना राजाकडून संरक्षण दिले जात असे.शिवकाळात सुवर्णालंकार व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जात होता.बाजारपेठेची भरभराट होण्यासाठी व्यापाऱ्यांना सवलती द्याव्या लागत.व्यापारीवर्ग ज्या बाजारपेठेत सुरक्षिततेची हमी असेल अशाच बाजारपेठेला प्राधान्य देत असत.शिवकाळात या व्यापाराला संरक्षण देण्याची पुरेपूर काळजी शिवाजी महाराजांनी घेतली होती.कारण त्याशिवाय व्यापाराची भरभराट होऊन राज्याची आर्थिक परिस्थिती सुधारणार नव्हती याची खात्री राजांना होती.शिवाजी राजांनी व्यापार वृद्धीसाठी व्यापार सवलती व जकातीत सूट दिल्याचे अनेक उदाहरणे त्यांच्या पत्रातून आढळतात.शिवाजी महाराजांनी आपल्या किल्यावर, खेड्यांमध्ये अनेक नवीन बाजारपेठ वसविल्या होत्या. शिवकाळात कोकणात चौल, दाभोळ, भिवंडी, कल्याण, पेण ई. ठिकाणी व्यापारी केंद्र होती. महाराजांनी इंग्रज, डच व फ्रेंच यांच्याशीही व्यापार वाढविण्याचा प्रयत्न केला.शिवाजी महाराजांनी आपले आरमार समृद्ध करण्यासाठी जहाज बांधणी उद्योग सुरु केला

होता.कोकणात मीठ तयार करून विकण्याचा उद्योग मोठ्या प्रमाणात केले जात असे,अनेक इंग्रज व्यापारी महाराष्ट्रातील विविध बाजारपेठातून स्वस्तातील वस्तू खरेदी करून त्या युरोपला विक्री करित असत. इतर देशातून येणाऱ्या मालावर जकाती आकारल्या जात असत.स्वदेशी उद्योग व व्यवसायांना संरक्षण सुद्धा या जकातीमुळे मिळत असे. स्थानिक भागातील एखाद्या वस्तूला विदेशी वस्तूमुळे उठाव नसेल तर अशी विदेशी वस्तू बाजारपेठेत कमी करण्यासाठी त्यावर जास्त जकात आकारणीचे आदेश महाराजांचे होते. यामुळे राज्याचे उत्पन वाढून स्थानिक उद्योगांना संरक्षण मिळत असे.थोडक्यात स्वराज्यातील उद्योग व्यवसायांना संरक्षण देण्याचे धोरण राजांचे होते असे आढळून येते. अनेक विदेशी व्यापाऱ्यांचे महाराष्ट्राशी घनिष्ट संबध होते. दारुगोळा, बंदुका, तोफा ई. वस्तू इंग्रजाकडून खरेदी केल्या जात असत.मात्र इंग्रजांना महाराजांनी अंतर्गत व्यापारापासून दूर ठेवले होते.त्यामागे स्थानिक व्यापाऱ्यांना त्यांच्या स्पर्धेची झळ बसू नये हा मुख्य हेतू होता व इंग्रजांचा अंतर्गत राजकारणात हस्तक्षेप वाढू नये असाही उद्देश होता. म्हणजेच इंग्रजांचा धोका महाराजांनी सर्वात अगोदर ओळखला होता.म्हणूनच त्यांनी इंग्रजांचा गरजेपुरता वापर केला पण त्यांचे स्तोम माजू दिले नाही.प्रत्येक वस्तूच्या व्यवसायावर कर आकारणी केली जात होती.मात्र ही कर आकारणी केल्यामुळे गरिबांचे हाल होणार नाहीत याची काळजी घेतली जात असे.स्वराज्याला कराच्या माध्यमातून मिळणाऱ्या उत्पनाचा मोठा भाग संरक्षण व्यवस्थेवर केला जात होता. आज महाराष्ट्रात औद्योगिक दृष्ट्या प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते मात्र या औद्योगिकरणाचे केंद्रीकरण मुंबई,पुणे,नाशिक यांसारख्या शहरांमध्येच झालेले दिसून येते.ग्रामीण महाराष्ट्र मात्र या औद्योगिकरणा पासुन उपेक्षित राहिला आहे. ग्रामीण भागात उद्योगांचा विकास विस्तार होण्यासाठी शिवकालीन उद्योग व्यवसाय धोरणांची नितांत आवश्यकता आहे.

**निष्कर्ष :-**

शिवाजी महाराजांचा शिवकाळ म्हणजे भारताच्या इतिहासातील सुवर्णकाळ होता असेच वरिल विवेचनावरून म्हणावे लागेल.शिवाजी राजांनी खर्या अर्थाने रयतेचे राज्य स्थापन केले.त्यांची थोरवी विदेशी इतिहासकारानीही मान्य केली. शत्रुप्रदेशातील रयेतेलाही शिवाजी महाराजानी व त्यांच्या सैन्यानी त्रास दिला नाही. राजांची योग्यता सांगताना जगातील इतिहासकार सांगतात की, महाराज हे थोर व्यक्तिमत्व, धाडसी योद्धा व युद्धकला पारंगत राजा, शुद्ध शील, उदार व सहिष्णू, समाजवादी समाज सुधारक असे सर्वगुण संपन्न होते.शिवाजीचे राज्य म्हणजे आदर्श स्वराज्य होते.महाराजांनी महाराष्ट्रात घालून दिलेली उदाहरणे, सवयी,रुजविलेली एकीची भावना यामुळे शत्रूच्या मनात धास्ती बसली होती.महाराजांचे शेती व शेतकऱ्याविषयी धोरण, महसूल

पद्धती,आर्थिक धोरण, उद्योग व व्यवसाय धोरण हे रयतेला डोळ्यासमोर ठेवून राबविली जात होती. शिवाजी महाराजांनी परमुलुख लुत्तानाही श्रीमंतांचीच लुट केली तीही केवळ आर्थिक इतर लुट मात्र केली नाही.म्हणूनच इतिहासकार महाराजांना ‘चारित्र्य संपन्न कुशल सेनापती आणि कर्तृत्वशाली राजनीतीज्ञ’ म्हणतात. तसेच एखादे राज्य निर्माण करण्यासाठी आवश्यक असणारे सर्व गुण त्यांच्यात होते. शिवाजी रजनी इंग्रजांचे संकट अगोदरच ओळखले होते व त्यांना स्वराज्यात लुडबुड करण्यास सक्त मनाई होती.वरिल सर्व विश्लेषणावरून शिवाजी महाराजांची कृषी, उद्योग व व्यवसाय आणि एकुणच योग्यता व कामगिरी स्पष्ट होते.

ज्याप्रमाणे सूर्य पृथ्वी वरून जेवढा दिसतो त्यापेक्षा लाखो पटीने मोठा आहे.त्याच प्रमाणे युगप्रवर्तक शिवाजी महाराज माहित आहेत त्यापेक्षाही लाखो पटीने मोठे आहेत. आज आपल्या देशाला शिवाजी महाराजांसारख्या जनतेला अनुकूल अशा ध्येय धोरणांची आवश्यकता आहे.तरच पुन्हा शिवराज्य निर्माण करता येईल. राजांबद्दल म्हटले जाते की,

**झाले बहू, ‘आहेतही बहू’ आणि होतीलही बहू । परंतु यासम नाही ॥**

**संदर्भ ग्रंथ :-**

१) देशमुख मा.म., युगप्रवर्तक शिवराय आणि मराठ्यांची शौर्य गाथा, विश्वभारती प्रकाशन,नागपूर,(जून १९७२)

२) देशपांडे प्रल्हाद नरहर,मराठ्यांचा उदय आणि उत्कर्ष,मोघे प्रकाशन,पुणे, (१७९४)

३) कुलकर्णी अ.रा.,देशपांडे प्र.न.,मराठ्यांचा इतिहास, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस,पुणे,(१९७९) ४) कुलकर्णी अ.रा.,शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन,पुणे,(१९९७)

५) लोकराज्य मासिक

६) दै.अग्रोवन, लोकसता